


Vinodini Patankar-Joshi, Batch-1954.

मलाही काही आठवणी लिहाव्या असे वाटले 1947 ते 1954 ची 7 वर्षे।

तळमजल्यावर मुलीचं ट्रेनिंग कॉलेज ।त्यांच्या शेती विषयासाठी ground च्या काही भागात मका कोथिंबीर मेथी वगैरे भाज्या लावत त्यामुळे आम्हाला स्वस्तात या गोष्टी एकदम ताज्या खायला मजा असायची.अत्रेंबाईंप्रमाणे प्रसिद्ध डायरेक्टर के,नारायण काळे यांच्या मिसेस मुख्याध्यापिका होत्या ।त्या English शिकवत कधीतरी वर्गावर आल्या की 2-2तास शिकव तेव्हा. English ला textbook नव्हतं. General English असे. सर्व शिक्षकबद्दल बरेच लिहिले आहे।6 वि मध्ये ठकार बाई English साठी कित्ता गिरवायला चपटे शिसे असलेली पेन्सिल वापेरायची सक्ती करीत. अशी गम्मत!!दररोज games चा तास सक्तीचा असल्याने आपली शाळा लंगडी, खो-खो आणि हतुतु मध्ये चॅम्पियन होती. मी लंगडी आणि खो-खोच्या टीम मध्ये होते .

Gathering च्या एका कार्यक्रमाला माजी पंतप्रधान इंदिरा गांधी प्रमुख पाहुण्या होत्या. अर्थात त्यावेळी त्या काँग्रेसच्या एक नेत्याहोत्या. Gathering 1दिवस विद्यार्थी आणि 1 दिवस पालकांना असे 2दिवस असे. 1वर्षी चिलयाबाळाची संगीतिका खूपच गाजली होती. मी त्यात चिलयाचे कामकेले होते.

भव्य दगडी इमारत Central Hall म्हणजे छोटे थिएटर च विशेष बैठक सुंदर स्टेज. Drill Hall, Drawing Hall, 1-1 bench semicirculer मांडणी. प्रेमळ चव्हाण सर 'मावशे' अशी हाक मारत. Ground Flour वर गायन, शिवण वर्ग. शिवणाच्या बाई बहुतेक 'ज्यू' होत्या. दर तासाला टीप, हेम, नमुना आवश्यक. नाहीतर order marks ही शिक्षा.

House System--- माझ्या आठवणीप्रमाणेय रेड,यलो ,ग्रीन,आणि ब्लू.अशी नावे. प्रत्येक वर्गातील मुली त्यात असत. 10वी ,11वी तील प्रमुख असे. निरनिराळ्या स्पर्धा दर महिन्याला होत.

तळमजल्यावर मुलीचं ट्रेनिंग कॉलेज. त्यांच्या शेती विषयासाठी ground च्या काही भागात मका, कोथिंबीर, मेथी वगैरे भाज्या लावत. त्यामुळे आम्हाला स्वस्तात या गोष्टी एकदम ताज्या खायला मजा असायची.

काही प्रार्थना आठवल्या. बहु असोत सुंदर , मंगलमय नाम तुझे सतत राहु दे ,या भारतात बंधु भाव नित्य असू दे दे वरची असा दे ,बघ बाल रवी हा आला।

काही गमती--- चव्हाण सरांची 1 सवय. दर 5 मिनिटांनी हाताच्या दोन्ही कोपरांनी पॅन्ट वर खेचत. आम्ही तासात किती वेळा असे केले ते मोजत असू आणि खूप हसत असू. ऑफ तासाला वर्गाच्या दार खिडक्या लाउन हसण्याची competition लावत असू. 1 मुलगी खिडिकीत थांबून teacher येत नाहीत ना पाळत ठेवत असे. सायन्सच्या तासाला आर्किमिडीजचा प्रयोग करताना पाण्यात खुब धमाल करायचो.

माझ्या सख्या. चित्रा आपटे,अजूनही आम्ही संपर्कात आहोत, नीला धोपवकर ,मीरा रणदिवे , सुलभा गजेंद्रगडकर, शकु खुळगे, मंदा व यमुना जोशी, सुधा बापट ,हंसा काशी दामले, माजी मंत्री भाऊसाहेब हिरे यांच्या 2 मुली पैकी 1 पुष्पा ही पण मंत्री झाली होती, उषा खरवंडीकर ,अश्या खूप जणी. आमचा वर्ग खेळ, स्पर्धा, अभ्यास यात सतत पुढे असे.

1954 ला ssc झाल्यावर HPT.la admission घेतली. B.A., M.A. Sanskrut Special subject घेऊन B.A. ला Pune University मध्ये 1stclass MA ला 2nd आले. शाळेपासून खो खो खेळत होते. college मध्येही team मध्ये होते.

Inter College champion होते. Pune University represent केली. Table Tennis mix doubles, Ladies doubles, Inter college champion होते. सगळे क्रेडिट अर्थात शाळेलाच आहे!

1963 मध्ये वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात संस्कृत व इंग्रजीची शिक्षक म्हणून काम केले विद्यार्थी कामगार वर्गातील पण 100 गुणांचे संस्कृत शिकवले आदर्श शाळेतील शिक्षक. दर वर्षी 1संस्कृत नाटिका लिहून सादर करत असे।शाळा सुरवातीला 11विपर्यंत विद्यार्थ्यांना खूप शिकवावे लागले काही जणांकडे चाकू सुरे matkyachi तिकिटं सुध्दा असायची ।संस्कार करत 1ली पासून11वि पर्यंत अथर्वशीर्ष पाठ करून शुद्ध म्हणायला शिकवले 10वि झाल्यावर 100टक्के निकाल होता आपल्या शाळेतील आदर्श शिक्षकांप्रमाणे आवडती शिक्षिका झाले ।निवृत्त होऊन 25 वर्षे झाली तरी खूप विद्यार्थी आजूनही सम्पर्क साधतात कोविड काळात सुरवातीचे 2 महिने मी पुण्यात एकटी राहत असताना हे विद्यार्थी सतत विचारणा करीत फार आधार वाटे ।

1995. साली निवृत्त झाले संस्कृतसाठी वेगळे करायचे होते त्याचवेळी संस्कृत भाषा संस्थे शी संबंध आला 1ली ते 4 thi साठी संस्कृत वाचन माला चा प्रकल्प हाती घेतला होता । मी जॉईन झाले पुस्तके लिहिण्यासाठी।मोठा वाटा स्वीकारला।पण शाळांनी पुस्तके accept केली नाहीत मग सँस्थेने च या पुस्तकांवर आधारित स्पर्धा pariksha घेण्याचे ठरविले।त्याचे सर्व नियोजन व आराखडा तयार करण्यात मोठाच सहभाग घेतला।1999 मध्ये m.c .q. पद्धतीने मुंबईत 350 विद्यार्थ्यानि ही exam dili .2000मध्ये मी पुण्यात आले ।या ससंस्थेची शाखा एकटीच्या प्रयत्नाने सुरु केली ।निवेदनाद्वारे सहकारी मिळाल्या।5 वी ते 7 वी च्या मुलांसाठी ही परीक्षा सुरू केली शाळांमध्ये संपर्क साधून पुण्यात परीक्षा सुरू झाली।मी व सहकारी मिळून शिकवत होतो ।workshop gheun शिक्षक तयार केले।प्रसार वाढला ।निरनिराळ्या शाळा मध्ये जाऊन smstheche शिक्षक शाळेच्या वेळात 2 तास 5 वी ते 7 वि ही पुस्तके वर्ष भर शिकवतात ।7 वीत सर्व मुलांची रिक्षा घेतली जाते जानेवारी महिन्यात ।सध्या पुण्यातील 5 ते 6 शाळांमध्ये हे वर्ग चालू आहेत ।बऱ्याच ठिकाणी 1ली ते 7 वि हे वर्ग वर्षभर चालू आहेत ।सध्या 25 ते 30 शिक्षक तयार झाले आहेत सर्व शिक्षिका असून त्या गृहिणी आहेत संस्कृतवरील प्रेमाने हे काम गेली 20 वर्षे चालू आहे पुण्यातील साधारण 300 ते 350 विद्यार्थी दर वर्षी एकाच दिवशी ही परीक्षा देत आहेत। 1980 साला पासून मी सल्लागार म्हणून काम करते इतर सर्व जबाबदारी आतां माझ्या सहकारी एका कुटुंबाप्रमाणे सांभाळत आहेत ।

तर असे माझे निवृत्तीनंतर चे आयुष्य सुखाने चालू आहे पतिनिधनंतर गेले दीड वर्ष मी पुण्यात एकटी राहत आहे। परमेश्वर कृपा। हे सगळे करू शकत आहे कारण आपल्या शाळेचे व college madhil sanskar ase me mante . Dhanywad .

अशा कितीतरी आठवणी आहेत सर्वगुरुजनांबद्दल मनापासून कृतज्ञाता ।सर्व मैत्रिणी ना dhanyawd।

ही माहिती व हे साहित्य सर्वस्वी माझे आहे व ग. ग. संबंधी व्हाट्सअप ग्रुप, फेसबूक ब्लॉग तसेच स्मरणिकेत प्रसिद्ध करण्यास मी स्वखुशीने संमती देत आहे.
धन्यवाद.

Vinodini Patankar-Joshi,

Batch – 1954

+91 8888399362